# <u>रे.मु.नं.२९९/२०१२ मधील नि.क.१९ वरील आदेश</u>

*<u>विश्वनाथ पाटील, वगैरे</u>* ... *वादी*
*विरुध्द*
*<u>रमेश पाटील, वगैरे</u>* ... *प्रतिवादी*

१. सदरचा अर्ज वादीने, मयत वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-

सदरचा दावा प्रलंबित असताना वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे दि.१७/१२/२०१३ रोजी मयत झाले. त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे ३/१ ते ३/४ असे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांस सदर दाव्याचे कामकाज पुढे चालविण्याचा कायदेशीर हक्क आहे. करीता, अर्ज मंजूर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास म्हणणे दिले असून वादीने सदरचा अर्ज हा ब-याच विलंबाने दिला आहे. त्यामुळे वादी क्र. ३ विरुध्द सदरचा दावा अबेट झाला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी मागणी केलेली आहे.

४. सदर दाव्यातील वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे मयत आहेत. तरी, कायदयानुसार कोणत्याही दाव्यामध्ये संबंधीत सर्व पक्षकारांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे असते. तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्याकरीता सर्व पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे असते. त्यामुळे मयत वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे यांचे वारस म्हणून अर्जात नमूद ३/१ ते ३/४

यांना अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.क्र.१९) मंजूर करणेत येत आहे. |
| २. | वादी यांनी मयत वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे यांचे वारस म्हणून अर्जात नमूद ३/१ ते ३/४ यांना विहीत मुदतीत दाव्यात समाविष्ट करावे. |

उरण.　　　　　　　　　　　　(ए.बी.चव्हाण)
दिनांक : २५/०७/२०१७　　　　दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.